2022

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

पुरवणी अंक ७ – डिसेंबर २०२२ (त्रैमासिक)

• शके १९४४ • वर्ष : ९० • पुरवणी अंक : ७

संपादक मंडळ

• प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे • प्रा. डॉ. मृदुला वर्मा • प्रा. श्रीपाद नांदेडकर

अतिथी संपादक

• डॉ. गिझाला हाश्मी • डॉ. सिद्धार्थ हरिदास मेश्राम • प्रो. मोहम्मद असरार

* प्रकाशक *

श्री. संजय मुंदडा
कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

कार्यालयीन वेळ
सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

विशेष सूचना : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

अक्षरजुळणी : सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# मराठी साहित्यात अनुस्यूत मानवतावादी मूल्ये : एक परीक्षण

प्रा.डॉ. विजय रुपराव राऊत
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
श्री पंढरीनाथ कला वाणिज्य महाविद्यालय,
नरखेड जि.नागपूर पिन- ४४१३०४
मो. ९८५०२३६८७९, ई-मेल-parambiraut@gmail.com

**सारांश (abstract ) :**

मराठी साहित्यातील परंपरागत विचारसरणी दूर सारून अखिल मानवासाठी कल्याणकारी, उन्नयनात्मक वैचारिक मूल्यांची पेरणी होणे हे मराठी साहित्याचे निरोगी लक्षण ठरते. दिवसेंदिवस मानवता नष्ट होत चाललेल्या समाजात इष्ट, नैतिक बीजांची रुजवण होणे अत्यावशक होते; ती काळाची गरज मराठी साहित्याने सामाजिक, कालिक भान ठेऊन पूर्ण केली ही कृती साहित्याची सार्थकता व समर्थकता दर्शवणारी ठरते. मराठी साहित्यिकांना मानवतावादाची उपयोगिता लक्षात येऊन त्यासाठी त्यांनी केलेली साहित्यनिर्मिती खरोखरच मानवी अभ्युदय साधण्यासाठी महत्त्वाची आहे.कथा, कविता, कादंबरी, नाटक इत्यादी साहित्यप्रकारांतून झालेले मानवी सर्जन उल्लेखनीय आहे.

**बीजशब्द :** मानवतावाद, मानवी मूल्य

**प्रस्तावना :**

मराठी साहित्य सर्वसमावेशक आहे.त्यात भारतीय तत्त्वज्ञानावरोबरच परकीय तत्त्वज्ञानाचाही समावेश झालेला आहे. जे-जे चांगले, समाजहितकारक, मानवी कल्याणाला उपयोगी त्या-त्या सर्व तत्त्वज्ञानाचा समावेश मराठी साहित्यात अंतर्भूत झालेला दिसतो.त्यात विविध वाद, मूल्ये, विचारसरणीचा समावेश होतो. या सर्वसमावेशक वृत्तीमुळेच मराठी साहित्याचा उत्तोरोत्तर विकास होताना दिसतो.

मानवतावाद हा मराठी साहित्याचा स्थायीभाव आहे,असे म्हटले तरी ते अतिशयोक्ती होणार नाही. संत ज्ञानेश्वरांपासून आजच्या युगापर्यंत हा मानवतावाद अधिकाधिक विस्तारात गेलेला दिसतो. संत ज्ञानेश्वरांचे ज्ञानेश्वरीतील पसायदान म्हणजे संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी केलीली प्रार्थना ठरते.

"जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी राती वाढो
भूतां परस्परे जडो मित्र जीवांचे ।।
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मे सूर्ये पाहो
जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ।।"
(पसायदान,संत ज्ञानेश्वर)

ही संत ज्ञानेश्वरांची प्रार्थना अखिल मानवजातीच्या कल्याणाचा जाहीरनामा ठरतो. मानवाच्या सुखासाठी, आनंदासाठी, कल्याण-साहचर्याकरिता मागितलेले हे पसायदान म्हणजे मराठी साहित्यात मानवतावाद दृढ करणारी महत्त्वाचे वटीत आहे.

**मराठी साहित्यात प्रतिबिंबित झालेले मानवतावादाचे स्वरूप :**

मानवतावादाची कास धरणारे महत्वाचे कवी म्हणजे आधुनिक मराठी काव्याचे जनक केशवसुत हे होत. केशवसुतांनी परंपरागत काव्याला आधुनिकतेकडे नेले. आपली कविता निव्वळ सौंदर्याची कविता न ठेवता तिला सामाजिक आशयाची जोड दिली, त्यांची कविता दलित, गरीब, शोषितांच्या जीवनाचा वेध घेणारी ठरली. 'स्फूर्ती', 'तुतारी', 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न'इ. कविता मानवतावादाचा पुरस्कार करणाऱ्या कविता आहेत.

"वल्हीची मग नौका करुनि व्योमसागरावरी जाऊ
उडुरत्ने या गरीब धरेला तेथुनि फेकुनि देऊ"
('स्फूर्ति' केशवसुत )

'स्फूर्ती' या कवितेतील केशवसुतांच्या या ओळी 'गरीब' धरेची चिंता करताना दिसतात. गरिबांच्या कल्याणाकरिता ते देवांशी सुद्धा झगडण्याची भाषा करताना दिसतात. "नव्या युगाचा शिल्पकार अखेरीस मानवच आहे याची त्यांना प्रखर जाणीव होती. त्याकरिता आवश्यक असणारी संस्कारित उच्च दर्जाची विचारशीलाता केशवसुतांजवळ होती."[१] केशवसुतांना मानवतावादी मूल्यांची जोपासना देवापेक्षाही महत्वाची वाटते.यावरून केशवसुतांच्या मानवतावादी विचाराची व्यापकता सिद्ध होते.

कुसुमाग्रजाची कविता माणसाच्या अवतीभवतीचे, त्यांच्या गंभीर प्रश्नांचे रेखाटताना दिसतात.धगधगीत वास्तव रेखाटन करणारी कविता असे कुसुमाग्रजांच्या कवितेचे वर्णन करता येईल. भांडवलशाहीत मजुरांचे होत असलेले शोषण त्यांना अमान्य आहे. म्हणूनच त्या शोषणाविरुद्ध लढण्याची भाषा त्यांची कविता करते. मानवी मूल्यांची होत असलेली होळी

ISSN No 2394-5990

त्यांना उद्विग्न करते. कुसुमाग्रजांची कविता काळाचे भान ठेऊन तेच "स्वतःच्या राष्ट्राच्या सीमा ओलांडून तिने सगळ्या मानवजातीच्या सुखःदुःखाशी आपले नाते जोडले."[2] भांडवलशाही संकटात सापडलेला माणूस 'हिमलाट', 'आगगाडी आणि जमीन', 'आहि-नकुल', 'जा जरा पूर्वेकडे', इ. कवितांमधून चितारलेला आहे. माणसाला आपल्या स्वार्थासाठी गुलाम बनविणाऱ्या वृत्ती-प्रवृत्तीवर कुसुमाग्रजांची कविता तुटून पडते. त्याचप्रमाणे अनिलांची 'मानवता' ही कविता प्रखर मानवतावादी दृष्टीकोनाचा पुरस्कार करताना दिसते.

विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत मराठी साहित्यातील मानवतावादी दृष्टी विकसित झालेली दिसते. साहित्यात या काळापर्यंत विशिष्ट समाजातील सुख-आनंद, चैन, त्यांचे दुःख, भोग इत्यादी गोष्टींचे उल्लेखच मोठ्या अलंकारिक भाषेत होत होते. माणूसपण हरवल्याची चिंता हे साहित्य करीत नव्हते पण दुसऱ्या महायुद्धाच्या अतिविध्वंसानंतर झालेली मानवी मूल्यांची होळी, नैतिक पतन, हाल-अपेष्टा, हरवलेली स्वप्ने या सर्वांचा शोध घेण्याचा प्रयत्न १९४५ नंतरच्या साहित्यात झाला असे दिसून येते. दुसऱ्या महायुद्धात झालेल्या प्रचंड मानवहानीनंतर मानवी अस्तित्वाची दखल अखिल जगाबरोबरच मराठी साहित्याने सुद्धा घेतली .मानवाचे या पृथ्वीवरील अस्तित्व काय ? हा प्रश्न जगातील इतर साहित्याबरोबर मराठी साहित्यातही चर्चिला जाऊ लागला.

बा. सी. मर्ढेकरांची कविता ही नवकविता म्हणून ओळखली जाते. मर्ढेकरांनी आपली कविता समकालीन वास्तवाच्या आधारे लिहिली. यंत्रयुगात मानवाचे होत असलेले खच्चीकरण, गरिबी, लाचारी, शोषण तसेच हरवत चाललेली मानवी मूल्ये याचे प्रभावी पण विडंबनपूर्ण वर्णन मर्ढेकरांनी 'काही कविता', 'आणखी काही कविता' या कवितासंग्रहातून केलेले दिसते. यंत्रयुग, भांडवलशाहीमुळे मानवी जीवनव्यवस्थेची होणारी फरफट याचे चित्रण अत्यंत उपहासपूर्ण रीतीने करताना दिसतात. "मानवाच्या मूलभूत प्रश्नापासून ते दूर नाहीत कारण विश्वव्यवस्थेशी असणाऱ्या आपल्या भावना, नात्यांचा, सेंद्रिय ऐक्याचा त्यांना विसर पडत नाही. समाजवादाच्या किंवा विज्ञानवादाच्या पराभवाच्या प्रत्ययानंतर मानवी कल्याणासाठी असणाऱ्या इतर मार्गांचा शोध त्यांची प्रज्ञा घेऊ बघते."[3] व याच समाजजाणिवेतून मर्ढेकरांची कविता समोर येताना दिसते. मर्ढेकरांनी मुंबईतील माणसांचे जीवन आपल्या कवितेतून साकारले; मुंबईसारख्या मोठ्या शहरात पोटाची खळगी भरण्यासाठी, जीवाची ओढाताण करून जीवन जगणारा माणूस हा अस्तित्वहीन झालेला आहे, किड्यामुंग्यांप्रमाणे त्याचे जीवन शुल्लक आणि अर्थहीन झालेले आहे, असे मर्ढेकरांना वाटते. मर्ढेकरांची कविता माणूस हाच विषय केंद्रस्थानी ठेऊन लिहिलेली कविता आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात अतिशय प्रभावी वास्तव रेखाटणारे कवी शरच्चन्द्र वेगळ्या आशयाची कविता मांडतांना दिसतात. मुक्तिबोधांनी नवी सामाजिक मानवतावादी दृष्टी मराठी साहित्याला दिली. 'नवी मळवाट' , 'यात्रिक', या कवितासंग्रहातून त्यांनी वास्तवदर्शी कविता लिहिली. मार्क्सवादाबरोबर मानवतावादाचाही भक्कम पुरस्कार त्यांची कविता करताना दिसते. त्यांची मानवतावादी भूमिका 'सृष्टी ,सौन्दर्य आणि साहित्यमूल्य' या ग्रंथात स्पष्ट झालेली आहे. या ग्रंथात त्यांनी 'मानुषता' नावाचा सिद्धांत मांडला . माणसाचा माणूस म्हणून स्वीकार करणारा हा सिद्धांत आहे . मुक्तिबोधांच्या मते, ललित वाङ्मयाचे प्राणभूत तत्त्व रस नव्हे , लय नव्हे तर 'मानुषता' हे होय. 'मानुषता'हे बदलत्या सामाजिक मूल्यांचे अधिष्ठान आहे . सामाजिक मूल्यात जीवन हा मानवी अस्तित्वाचा एक पैलू आहे, तर मानुषता हा त्याच मानवी अस्तित्वाचा दुसरा पैलू आहे. एक परिवर्तनशील तर दुसरा शाश्वत आहे. मानुषता हे मानवाचे मुळातले 'असणे' आहे. मानुषता व प्रत्यक्ष सामाजिकता यातले द्वैत नष्ट करणे हे या प्रक्रियेचे उद्दिष्ट आहे. मानुषता, सकालात्म मानुषता हेच ललितकृतीचे संघटक तत्त्व होय."[4] असे मत प्रतिपादन करून मुक्तिबोधांनी मानवतावादी मूल्यांवर भर दिला.

स्वातंत्र्यानंतर साहित्यात नवनव्या मानवी मूल्यांची पेरणी होऊ लागली. नवकथा म्हणून समोर आलेल्या साहित्यप्रकारात गंगाधर गाडगीळांनी मानवतावादाची कास धरलेली दिसते. खरे तर त्या काळी कथा हा साहित्यप्रकार जनसामान्यांपर्यंत पोहचणारे प्रभावी माध्यम होते. त्या माध्यमातून गाडगीळांनी आपली मानवतावादी भूमिका अचूक मांडली, 'किडलेली माणसे' या कथासंग्रहातील कथा याचे उत्तम उदाहरण आहे. 'खडक आणि पाणी' या समीक्षा ग्रंथात त्यांची मानवतावादी भूमिका स्पष्ट होते. ते म्हणतात, "साहित्याचा हेतू माणसांचे अनुभवाचे विश्व संपन्न करणे हा असतो. हे करण्याकरिता अनुभव घेण्याच्या नव्या आणि भिन्न पद्धती साहित्यातून व्यक्त झाल्या पाहिजेत. अनुभवांचे सूक्ष्मतर स्वरूप वाचकांच्या प्रत्ययास आले पाहिजे. अनुभवांच्या अनेक पातळ्यांवर वाचकांचे मन गेले पाहिजे. हे सगळे करायचे म्हणजे सर्वसामान्य अनुभवाचे चित्रण करून भागणार नाही. त्याकरिता असामान्य अनुभवांचे चित्रण केले गेले पाहिजे. आपण सगळे समाजाचे घटक आहोत हे जितके खरे आहे तितकेच आपण व्यक्ती आहोत हे देखील खरे आहे."[5] मानव प्राणी म्हणून केवळ जगणे, मैथुन करणे, जमात वाढवणे हा हेतू मानवाचा जगण्याचा मुख्य हेतू नसावाच. माणूस म्हणून आपल्या मानवी अस्तित्वाशी प्रामाणिक राहणे, सर्व मानवाचे

ISSN No 2394-5990

# संत वाङ्मय : प्रबोधनाची अक्षय्य परंपरा

**प्रा. डॉ . विजय रुपराय राऊत**
सहयोगी प्राध्यापक,मराठी विभाग
श्री पंढरीनाथ कला वाणिज्य महाविद्यालय,
नरखेड जि. नागपूर,
इमेल : parambiraut@gmail.com

**सारांश :**

स्थळ, काळ व परिस्थितीचा विचार केला तर संतकालीन परिस्थिती आणि सद्य परिस्थितीत फार मोठी तफावत निदर्शनास येते. पण तरीही संतांचे विचार अक्षय्य ठरतात याचे महत्त्वाचे कारण त्यांची सामाजिक जाणिवेतील संवेदनशीलता, मानवी आकलन व त्यांच्या ठाई असलेली कालातीत दृष्टी होय. आज आपण कितीही विकसित, यांत्रिक आणि तंत्रस्नेही झालो असलो तरीही संतांनी अधोरेखित केलेल्या मुद्द्यांना टाळून आपला प्रवास सहज शक्य होणार नाही. संतांनी फक्त वर्तमानाचा विचार केला नाही तर मानवी प्रवासात त्याला पुरेशी शिदोरी सुद्धा त्यांनी आपल्या अभंगात बांधून दिलेली आहे. सहस्त्र वर्षापासून चालत आलेली संतांच्या प्रबोधनाची आणि मार्गदर्शनाची परंपरा आजही याच कारणाने टिकून आहे.

**प्रस्तावना :**

भारत भूमीला संतांची समृद्ध अशी परंपरा लाभलेली आहे. संतांनी आपल्या ग्रंथातील तत्त्वज्ञानातून सामाजिक अभ्युदयाचा ध्यास धरला आणि महत्त्वाचे म्हणजे संतांच्या या ग्रंथ वाङ्मयातून व्यक्त होणारे तत्त्वज्ञान कालातीत ठरते याचे कारण संतांची दूरदृष्टी होय. महाराष्ट्र देश तर संतांची पुण्यभूमीच होय. संत ज्ञानेश्वरांपासून संत नामदेव, चोखोबा, सावता माळी, गोरोबा, विसोबा खेचर सेनान्हावी ,कानोपात्रा येथून तर १६ व्या शतकातील आलो याच कारणाशी बोलले जे ऋषीमुनी असे ठणकावून सांगत आडराणाने भरले जग सद्मार्गाने लावणे हेच आमच्या येण्याची प्रयोजन आहे असे जाहीरपणे सांगणाऱ्या जगद्गुरु तुकारामापर्यंत ही परंपरा खंडित अव्याहत सुरू होती. पुढे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व अवघ्या महाराष्ट्राला गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला असे म्हणून स्वच्छतेचे धडे व अंधश्रद्धेच्या विळख्यात सापडलेल्या समाजाला विज्ञानाची व आधुनिकतेची दीक्षा देणारे महान संत गाडगे महाराज आज या महान कर्मयोगी मानसांच्या कर्मशीलतेची व कालातीत विचारांची उपयोगिता पटवून देण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधातून करण्यात येणार आहे.

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या गुरूला अत्यंत मनोभावे मागितलेले हे पसायदान तब्बल ८०० वर्षानंतरही नित्य नूतन असल्याचे जाणवते. संत ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्त्वात अनुस्युत कालातीत दृष्टीचा हा प्रभाव आहे.

**"जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो**
**भूता परस्परे जडो । मैत्र जिवांचे"**

ज्ञानेश्वरांच्या आदर्श समाज रचनेचे उदात्त उद्दिष्ट होते. आदर्श गुरु होण्यासाठी आदर्श शिष्य प्रथम व्हावे लागते त्याप्रमाणे त्यांच्या मनात समाजोद्धाराची ज्योत सतत प्रज्वलित असावी लागते म्हणूनच मांगल्यपूर्ण विश्वधर्माचे चालते बोलते प्रतीक म्हणजे हा गुरु असतो.

गुरूच दुर्जनांना सज्जनात रूपांतर करण्याची किमया करू शकतात. शिक्षणाच्या द्वारा दुर्जनांना नामशेष करायचे नाहीत तर त्यांची सज्जनात रूपांतर व्हावयाचे हा पसायदानाचा मूलभूत संदेश आजच्या लोकशाही जीवनपद्धतीलाही अचूक मार्गदर्शन करण्यास पुरेपूर समर्थ आहे किंबहुना आजही या पसायदानाची उपयोगिता अबाधित आहे असे म्हणावयाला हरकत नाही; असे सद्य परिस्थितीच्या आकलनानंतर ध्यानात येते. असे अक्षर वाङ्मयतत्त्व,अक्षर विचार समाजाला देण्याची क्षमता संतांच्या लेखणीत होती.

संत ज्ञानेश्वरांनी संपूर्ण ज्ञानेश्वरीत तत्त्वज्ञान सांगितले ते मानवाच्या शारीरिक व मानसिक उन्नतीकरीता उपकारक असेच आहे.

**"हे विश्वची माझे घर। ऐसी मती जयाची स्थिर।।**
**किंबहुना चराचर ।आपणची झाला ।।"**

असे विचार बाराव्या शतकापेक्षा आजच्या खंडित होत चाललेल्या काळात अधिक सुसंगत आणि परिणामकारक आहेत याची जाणीव झाल्याशिवाय राहत नाही. आज आपण घराच्या बाहेर पडतो तो एक परात्म भाव मनात घेऊनच.बाहेरच्या जगात आपण स्वतःला असुरक्षित समजत असतो या कारणाने माणूस एकमेकांविषयी कलुशीत भावनेने विचार करतो व वागतो; म्हणून 'हे विश्वची माझे घर' असा विचार मनात घेऊन निघालो

RNI MAHMAR
36829-2010

ISSN- 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay


International Research Journal

UGC-CARE LISTED

**Special Issue - II**


**Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation**






January 2021





Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi

Executive Editor : Prof. Kartik R. Patil

Principal,
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

Co-Editor : P. M. Rajurwade

Address
"Pranav", Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist- Latur 413515 (MS)

| | | |
|---|---|---|
| 24 | Between Hope and Hopelessness; The Study Of Shafi's Ahmed's "The half widow"<br>**Navreen Khaliq** | 84-86 |
| 25 | Position of Indian Auto Ancillary Industry in Indian Market<br>**Shri. Yamanappa C. Kelageri** | 87-90 |
| 26 | Financial Literacy- Greater Life Sill For Empowerment of Women<br>**Suresh G** | 91-93 |
| 27 | Reservation Policy in Higher Education Institutions: A Study in Response and Outcomes<br>**Anupam Yadav** | 94-96 |
| 28 | Minakshi Sane: Voice of Voiceless People<br>**Dr. Prabhakar Nagnath Kolekar** | 97-100 |
| 29 | Sustainable Household Livelihood Security Index (Methodological Review of SHLSI)<br>**Prakash Vhankade** | 101-106 |
| 30 | Water Pollution : Causes And Remedies<br>**S. Manjula** | 107-109 |
| 31 | Impact of Covid – 19 on Indian Economy<br>**K. Bhavani** | 110-113 |
| 32 | The Battleground Of Digital Privacy Amidst Covid -19 Pandemic And The Aarogya Setu App-An Appraisal<br>**Nanditha .V. Nair, Dr. Aejaz U. Shaikh** | 114-116 |
| 33 | A Geographical Study of NPK Status in Soil of Sangli District Maharashtra<br>**Mr. More Amol Vilas, Dr. P. V. Patil** | 117-119 |
| 34 | An analysis lockdown on salaried employees of private sector of Ramchandra Nagar, Dombivli<br>**Mr. Shrinivas R. Aiyar, Dr. Manikandan N. Iyer** | 120-122 |
| 35 | Stress Among Students In Virtual Classroom During Covid-19<br>**Dr. Swati H. Kekare** | 123-124 |
| 36 | A Geographical Analysis of Land Use Pattern in Maharashtra State<br>**Dr. H. B. Tipe, Santosh P Mane** | 125-127 |
| 37 | A Comparative Study of Work Culture and Environment Among Marathi Medium and English Medium Primary Schools in Satara District<br>**Mr. Borate Santosh Dashrath, Dr. Mrs. Dakle Sunita P.** | 128-131 |
| 38 | कोरोना काळात समाजासाठी योगाचे महत्त्व<br>**प्रा. डॉ. उदय. दा. मेंडुलकर** | 132-134 |
| 39 | उच्च शिक्षणात ग्रंथालयाची भुमिका<br>**प्रा.डॉ.तोटे दादासाहेव सर्जेराव** | 135-136 |
| 40 | हिंदी कथा साहित्य में आदिवासी विमर्श<br>**डॉ. योगिता दत्तात्रय घुमरे** | 137-138 |
| 41 | आभासी शिक्षणाचे फायदे व तोटे<br>**प्रा. डॉ. दिलीप घोंगडे** | 139-141 |
| 42 | कोविड-19 विषाणुचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम<br>**डॉ. नितेश रामदास बोरकर** | 142-144 |
| 43 | आगामी मुंबई महानगरपालिका निवडणूकीसाठी शिवसेनेची बदलती रणनीतीक भूमिक<br>**शरद बाबुराव सोनवणे** | 145-147 |
| 44 | पर्यावरणीय संकट आणि गांधी विचार<br>**डॉ. हनुमंत कुरकुटे** | 148-149 |
| 45 | हिमलाट पहाटे पहा जगावरी आली ! *(जगभर थैमान घालणाऱ्या कोरोना विषाणूमुळेअस्थिर सद्यस्थितीत कुसुमाग्रजांच्याकवितेची कालातीतता प्रत्ययास येणे सहाजिकच आहे.)*<br>**प्रा. डॉ. विजय रूपराव राऊत** | 150-152 |
| 46 | वर्तमान संदर्भ में किसान और मैथिलीशरण गुप्त का काव्य ('किसान'काव्य के संदर्भ में)<br>**डॉ. मीनाक्षी विनायक कुरणे** | 153-154 |
| 47 | कोविड 19 चा भारताच्या शैक्षणिक प्रशासनावर पडलेला प्रभाव<br>**डॉ. प्रवीण पांडुरंगराव लोणारकर** | 155-157 |

Akshar Wangmay UGC Care Listed, International Research Journal, ISSN 2229-4929, January 2021
Special Issue, Volume-II "Interdisciplinary Impact: Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language & Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation"

# हिमलाट पहाटे पहा जगावरी आली !

## (जगभर थैमान घालणाऱ्या कोरोना विषाणूमुळे अस्थिर सद्यस्थितीत कुसुमाग्रजांच्या कवितेची कालातीतता प्रत्ययास येणे सहाजिकच आहे.)

**प्रा. डॉ. विजय रूपराव राऊत**
सहयोगी प्राध्यापक, श्री पंढरीनाथ कला- वाणिज्य महाविद्यालय, नरखेड
ई-मेल - parambiraut@gmail.com

सारांश

कुसुमाग्रजांची कविता अनेक कारणांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरते; प्रतिमा ,प्रतीक ,यमक ,अलंकार ,मांडणी ,शब्द, नाट्यमयता ,विषय आणि आशय या सर्व अंगानी त्यांची कविता अर्थपूर्ण झालेली दिसते. कवितेतील प्रवाहीपणा अचंबित करणारा असतो त्यामुळेच त्यांची कविता समाजवास्तवाचे , मानवी भावभावनांचे नेमके वर्णन करताना दिसते.म्हणूनच त्यांची कविता रसिकमनाला थेट जाऊन भिडते. आजच्या स्थलकालाच्या चौकटीत न सामावणारी आणि अर्थाच्या नानाविध छटा लेऊन त्यांची प्रतिभा आविष्कृत होताना दिसते. आजच्या वास्तवाला बघता कुसुमाग्रजांच्या 'हिमलाट' तसेच इतर कवितेतील कालातीतता व कविमनातील द्रष्टेपणाची साक्ष आपोआप पटते . संपूर्ण जगाला घाबरवून सोडणारा , सर्व बलाढ्य देशांची त्रेधा उडवून देणारा व मानवाच्या पृथीवरील अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा 'कोरोना' म्हणजेच covid १९ हा विशाणू हिमलाटेसारखा पण एक मानवी संकट म्हणून समोर आलेला आहे .आजच्या कोरोनाचे संकट हिमलाटेत एकप्रकारे समांतर जागीच होऊन प्रकटताना दिसते. ही हिमलाट ज्याप्रमाणे संपूर्ण जगावर आली आणि संपूर्ण मानवी जीवन संपवायला आ वासून उभी राहिली ती हिमलाट कोरोनापेक्षा वेगळी ठरत नाही. कवी हा द्रष्टा असतो .सामान्यांपेक्षा अनन्य आकलन करणे आणि कलात्मकरीत्या प्रभावी मांडणी करून वाचकाला अद्भुत आनंद देऊन समाजवास्तवाशी अलगदपणे परिचित करून देणे हे कलावंताचे कार्य असते.

बीजशब्द - कोरोना , कालातीतता

## प्रस्तावना

मराठी साहित्याची अभिव्यक्तीची वैशिट्यपूर्ण अशी शैली आहे. कथा ,कादंबरी ,कविता, नाटक इ . साहित्यप्रकारांतून या शैलीचे वेगळेपण प्रकट होताना दिसते. कवितेच्या बाबतीत विचार केला तर कल्पना आणि वास्तवाचा अनुबंध आणि भव्यता अत्यंत अल्प शब्दांत साकारणे हा कवितेचा स्थायीभाव होय. यामुळेच साहित्याची कालातीतता टिकून राहाते. साहित्यात अनुत्सुत असलेला तत्त्वार्थ आणि व्यंगार्थ हा गुण साहित्याला कालातीत ठरण्यास मदत करीत असतो. त्यामुळे साहित्य हे एका माणसाचे ,पिढीचे ,काळाचे ,देशाचे न राहता वैश्विकता धारण करून प्रबोधनास सज्ज असते. प्रस्तुत शोधनिबंधात कवी कुसुमाग्रजांच्या काही निवडक कवितेच्या माध्यमातून समकालीन परिस्थितीचा वेध घेण्याचा आणि त्यांच्या कवितेतील कालातीत विचार अधोरेखित करण्यात आलेले आहे.

## कुसुमाग्रजांची कविता आणि सद्यपरिस्थिती

रचना विविध अलंकारांनी नटवून सुद्धा कवितेतील आशयाचे अलिप्तपण शाबूत ठेवणारे मराठी कवीजगतातील प्रतिभावान कवी कुसुमाग्रज हे मराठी साहित्यातील 'भूषण' आहेत. अनन्यसाधारण अश्या कवितेची निर्मिती त्यांनी केलेली आहे. त्यापैकी काही महत्त्वाच्या कवितांच्या आधारे समकालीन वास्तवाशी सांगड घालण्याचा प्रयत्न करता येऊ शकते. त्यापैकी 'हिमलाट' ही कविता होय.

*"हिमलाट पहाटे पहा जगावरी आली*
*मुर्खा पिऊन मद्यास्तव द्राक्षांचे घोस*
*पाईत मळे मोत्यांचे चरणी ओस*
*उद्दाम धावते करीत दुभंगधरेस*
*करकरा पाखरे रगडी दाताखाली*
*हिमलाट पहाटे पहा जगावरी आली "*

या ओळींतून वर्णन केलेले हिमलाटेचे स्वरूप आणि कोरोनाचे आज सर्व जगासमोरील विनाशरूपाची समानता दिसून येते. या जगरहाटीत अचानक कोरोना विषाणूचा उद्रेक व्हावा आणि क्षणार्धात सर्व जगाची तारांबळ उडावी हे वास्तव आज आपण उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत. या टाळेबंदीमुळे शेतकऱ्यांची दुर्दशा आपण सर्व खिन्न मनाने अनुभवतो आहोत. या कोरोनाने शेतकऱ्यांच्या तसेच अवघ्या प्राणिमात्रांची उदरभरण करणाऱ्या पिकांची नासाडी चालवलेली आहे . बेभाव शेतमाल विकावा लागतो आहे . काही ठिकाणी तर फेकावा लागतो आहे. हा कोरोना सर्वांना आपल्या विषाने दाताखाली रगडत आहे . सर्व जग सुरळीत चाललेले असताना अचानक हा कोरोना हिमलाटेसारखा जगावर पसरलेला आहे.

*"श्रीमंत महाली तिथे हिला न थारा*
*मखमाली दुलयादेती मधुर उबारा*
*डोकावून पळते कापत हीच थरारा*

IMPACT FACTOR (SJIF) 2021-7.380 ISSN 2319-4766

An International Peer Reviewed & Refereed Journal


# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL - JUNE,2021, VOL- 10, ISSUE-55

## राष्ट्रीय चर्चासत्र विशेषांक, मराठी विभाग, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, (जि. चंद्रपूर) महा.

मुख्य-संपादक
डॉ. सुबोध कुमार सिंह
प्राचार्य

संपादक
डॉ. जयश्री शास्त्री
मराठी विभाग प्रमुख



# सदानंद देशमुखांच्या ग्रामीण कादंबरीतील समकालीनता : एक दृष्टिक्षेप

प्रा. डॉ. [illegible] रूपराव राऊत
मराठी प्राध्यापक, श्री गहरीनाथ कला वाणिज्य महाविद्यालय, नरखेड, जि. नागपूर
मो. [illegible], ईमेल parambiraut@gmail.com

## सारांश (Abstract)

साहित्य हे काळाबरोबर प्रवाहित राहते. काळाचे वहन दिसते आणि जीवनाशी अधिकाधिक अद्वैत साधत असते. म्हणूनच साहित्य हा जीवनाचा आरसा आहे असे म्हटल्या जाते. कुणी तर साहित्य हे संग्रहालयच आहे. ज्याप्रमाणे वस्तुसंग्रहालयात त्या-त्या काळातील विविध वस्तू संग्रहित करून त्या काळाचा इतिहास जतन केल्या जातो आणि पुढच्या पिढीला भूतकाळाचे आणि आपल्या इतिहासाची नेमकी अचूक माहिती मिळते त्याप्रमाणे काळानुसार निर्माण होणाऱ्या साहित्यात मानवी मन, जीवन, आशा-अपेक्षा, सुख-दुःख, धारणा, प्रेरणा, संघर्ष, जातीय परस्पर संबंध आणि नैसर्गिक भूगोल, इतिहास, रूढी, परंपरा, तंत्रज्ञान इ. घटकांची नोंद आपसूक होत असते. जरी आजचा कलावंत कधी भूतकाळातील वा काल्पनिक कथा सादर करीत असला तरी त्या कलेला समकालाची अपरिहार्य अशी पार्श्वभूमी असतेच असते. ज्याप्रमाणे प्राणी आपले घटकधर्म घेऊनच जन्माला येतो त्याप्रमाणे साहित्यही समकाळ सोबत घेऊनच प्रकट होत असते. सदानंद देशमुखांची कादंबरी ही या प्रकारची आहे. त्यांच्या 'तहान', 'बारोमास', 'चारीमेरा' या कादंबऱ्यातून प्रकट होणारे समकालीन संदर्भ त्यांच्यातील संवेदनशील लेखक असण्याचे प्रमाण आहे. ग्रामीण जीवनातून स्वीकारलेले लेखन किती प्रभावी आणि परिणामकारक असू शकते याचा प्रत्यय देशमुखांच्या कादंबऱ्या वाचताना सहज प्रत्ययास येते.

**बीजशब्द** : समकालीनता, ग्रामीण जीवनजाणीव, समाजभान

**प्रस्तावना**

मराठीतील ग्रामीण साहित्याची परंपरा समृद्ध अशी आहे. त्यात कादंबरी हा साहित्यप्रकार विशेषत्वाने बहरलेला दिसतो. श्री. म. माटे, र. वा. दिघे, व्यंकटेश माडगूळकर, ना. रं. शेंडे यांच्यापासून तर पुढे महादेव मोरे, शंकर पाटील, [illegible], नागनाथ कोत्तापल्ले, उद्धव शेळके, आनंद यादव, प्रतिमा इंगोले, रवींद्र शोभणे, इंद्रजित भालेराव, सदानंद देशमुख इ. अनेक साहित्यिकांनी सकस अशी ग्रामीण मराठी कादंबरी निर्माण केलेली आहे. शेतकरी आणि त्याचे पाचवीला पुजलेले दुःख, शेतीतील नापिकी, कर्जबाजारीपणा, आत्महत्या, नोकरी, अस्मानी सुलतानी संकट इ. ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या ग्रामीण जीवनाची संवेदनशील रेखाटने या ग्रामीण कादंबरीतून प्रकर्षाने उमटत गेली. ग्रामीण भागाला औद्योगिकरणाची झळ कधी पोहचली आणि हळूहळू शेती आणि शेतकरी कसा नामशेष होऊ लागला यांचेही चित्रण या कादंबऱ्यांत येऊ लागले. एकविसाव्या शतकातील सुरुवातीला सदानंद देशमुखांची कादंबरी मराठी ग्रामीण कादंबरीचे नवे, विकसित रूप म्हणून समोर आली. 'तहान', 'बारोमास', 'चारीमेरा' या कादंबऱ्या ग्रामीण वास्तव जनजीवनाचे प्रगटीकरण करणाऱ्या कादंबऱ्या आहेत. ग्रामीण जीवनाची अवस्था, दुःख, पिचलेपणा अधिक धारदारपणे या कादंबऱ्यांतून प्रसूत होताना दिसते.

# CERTIFICATE

## OF PARTICIPATION

प्रा. डॉ. विजय रुपराव राऊत

Has successfully contributed and published a paper entitled here with

सदानंद देशमुखांच्या ग्रामीण कादंबरीतील समकालीनत एक दृष्टिक्षेप

In an

International Peer Reviewed & Refereed

**SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES**

Dr. Yashpal D. Netragaonkar
Editor In Chief for S R Journals

April-June, 2021 volume 10, Issue 55

ISSN 2319-4766, SJIF 2021 : 7.380

लोकशिक्षण संस्था द्वारा संचालित

# लोकमान्य महाविद्यालय, वरोरा,

## जि.चंद्रपूर (म.रा.)

संलग्नित

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## ✻ प्रमाणपत्र ✻

प्रमाणित करण्यात येते की, डॉ./श्री./श्रीमती विजय रुपराव राऊत यांनी **" समकालीन मराठी साहित्य : चिंतन आणि चिकित्सा"** या विषयावर लोकमान्य महाविद्यालय, मराठी विभागातर्फे आयोजित राष्ट्रीय वेबिनारमध्ये गुरुवार, दि. २४ जून २०२१ ला शोध निबंधवाचक म्हणून सहभाग नोंदविला. यांचा सदानंद देशमुखांच्या ग्रामीण कादंबरीतील समकालीनता : एक दृष्टिक्षेप हा शोधनिबंध *International Peer Reviewed and Refereed Journal, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies, Impact Factor - 7.380, ISSN 2319-4766* या संपादित चर्चासत्र विशेषांकात (प्र)काशित होत आहे.

| | |
|---|---|
| डॉ. सुबोधकुमार सिंह<br>प्राचार्य<br>लोकमान्य महाविद्यालय, वरोरा | डॉ. जयश्री शास्त्री<br>समन्वयक आणि मराठी विभाग प्रमुख<br>लोकमान्य महाविद्यालय, वरोरा |

# Poverty Index: Niti Aayog - "A Policy Commission And Future Challenges"

Dr. Ravi Sudhakarrao Sorte
Head,
Department of Economics
Shri Pandharinath Mahvidyalaya, Narkhed
ravisorte@gmail.com
Mobile : 9960183021
Tah – Narkhed Dist – Nagpur
Maharashtra

**Abstract**

The NITI Commission will bring in another MPI report after the NHFS submits its full report in five-six months for 2019-20, a senior NITI Commission official said. 25% of Indians are poor in MPI metrics, says NITI Commission report. Based on the National Health Family Survey (NHFS) for 2015-16, the NITI Commission stated that one out of every four people in India was multidimensional poor that year. The headcount ratio answers the question, "How poor are they?" India's national MPI (Multidimensional Poverty Index) identifies 25.01 per cent of the population as multidimensional poor, "the report said. Rajiv Kumar, Chairman, NITI Commission, said that India's national MPI measure has adopted a globally accepted and robust approach developed by the Oxford Poverty and Human Development Initiative (OPHI) and the United Nations Development Program (UNDP). Chief Executive Officer Amitabh Kant said the index aims to rigorously benchmark national and sub-national performance and drive programmatic action and improvement using globally recognized MPI monitoring mechanisms and procedures. Coincidentally, the MPI for 2021 launched by the United Nations Development Program (UNDP) and the Oxford Poverty and Human Development Initiative (OPHI) found that 27.9 per cent of India's population is multidimensional. The country ranks 62nd out of 109 nations in the index. The index was based on 10 indicators such as improved drinking water, adequate nutrition or at least six years of schooling. As this is the first report on MPI, it is difficult to compare the title numbers of multidimensional poor in a period. This is the first report on poverty since the NDA came to power at the Center in 2014 and the NITI Commission abandoned the previous poverty line system. The NITI Commission will come up with a second MPI report after the NHFS submits its full report in five-six months for 2019-20, a senior NITI Commission official said.

**Keywords**

Poverty Situation in India , Poverty Role in Development, NITI Commission Report , Regional Inequality of India

# बँकिंग क्षेत्रातील आव्हाने आणि संधी

सहा. प्रा. डॉ. रवी एस. सोरते
(अर्थशास्त्र विभाग)श्री पंढरीनाथ कला—वाणिज्य महाविद्यालय, नरखेड.
E-mail ID - ravissorte@gmail.com

सारांश :

भारतीय बँकिंग उद्योगाच्या प्रवास खूप मोठा दिसून येतो. भारतीय बँकिंगचा इतिहास बघत असताना असे दिसून येते की, पारंपरिक बँकिंगपासून तर वर्तमानकाळातील डिजिटल बँकिंगपर्यंतचा भारतीय बँकिंगचा प्रवास झालेला आहे. स्वातंत्र्यापूर्व ब्रिटिश काळापासून तर २१व्या शतकापर्यंत बँकिंग क्षेत्रामध्ये अनेक सुधारणा घडून आल्यात. बँकिंग क्षेत्र अधिक मजबूत व क्रियाशील बनविण्याकरिता त्यामध्ये वेळोवेळी अनेक सुधारणा करण्यात आल्या तसेच ग्राहकांना उत्कृष्ट सेवा देण्याच्या उद्देशाने त्यामध्ये अनेक आधुनिक व अभूतपूर्व बदल करण्यात आलेले दिसून येते. भारतीय बँकिंग क्षेत्रात नावीन्यपूर्ण बदल घडवून आणण्याकरिता अनेक बँकांचे वेळोवेळी राष्ट्रीयीकरण करण्यात आले तसेच खासगी बँकां ग्राहकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यामुळे सार्वजनिक व खासगी बँकांमध्ये एकप्रकारची स्पर्धा निर्माण होऊन ग्राहकांना उच्चतम व चांगल्या दर्जाच्या सेवा मिळण्यास संधी प्राप्त झाली. बदलत्या काळानुसार बँकिंग क्षेत्राने तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात स्विकार करून आपल्या कार्यशैलीत सुद्धा अनेक बदल घडवून आणला आहे. जागतिक पातळीवरील बँकिंग क्षेत्राचा विचार करता भारतीय बँकिंग क्षेत्राने तंत्रज्ञानात अनेक अभूतपूर्व बदल घडवून आणले व बँकिंग क्षेत्र जागतीक पातळीवर नेलेआहे. आधुनिक बँकिंगमध्ये Digital Banking अंतर्गत ATM, Mobile Banking, Internet Banking, RTGS, NEFT, IMPS, UPI इत्यादी सेवा सोबतच वृद्धांकरिता घरपोच बँकिंग सेवा **''बँक तुमच्या घरी''** ही सेवासुद्धा कोरोना काळात आपल्याला उपलब्ध झालेली दिसून येते. कोरोना काळात बँकिंग क्षेत्रात अनेक अभूतपूर्व बदल घडून आलेत.कोरोना काळात डिजिटल बँकिंगवर अनेक व्यक्तींचा विश्वास बसला व डिजिटल बँकिंग सेवांमध्ये अनेक लोकांचा सहभाग झालेला दिसून येतो. त्यामुळे बँकिंग क्षेत्रातील शाखांमधील गर्दी कमी होऊन घरबसल्या व्यक्ती बँकेचे व्यवहार मोठ्या प्रमाणात करीत आहे.बँकिंग क्षेत्रामध्ये तंत्रज्ञानाच्या वापरात होणाऱ्या वाढीबरोबरच अनेक धोके व समस्या सुद्धा वाढताना दिसून येत आहे. त्यामुळे बँकिंग क्षेत्राला व ग्राहकांना भविष्याच्या दृष्टिकोनातून खबरदारी घेणे आवश्यक आहे.

बँकिंग क्षेत्राकरिता निर्माण होणारी आव्हाने व संधी या दृष्टिकोनातून बँकिंग क्षेत्राचा अभ्यास या लेखात करण्यात आला आहे. अनेक बँकांच्या शाखांमध्ये वाढत जाणारा एनपीए ही बँकिंग क्षेत्रासाठी खूप मोठी समस्या निर्माणझाल्यामुळे. यावरील उपाय म्हणून सरकारने अनेक बँकांचे एकत्रिकरण करून सार्वजनिक क्षेत्रातील २७ बँकेचे १२ बँकेत रूपांतर केले आहे. भविष्यात सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणखी कमी होऊन जवळपास प्रमुख ४ बँका राहतील असा अंदाज आहे. तर दुसरीकडे खाजगी क्षेत्रातील बँकांच्या विकास होऊन आज भारतामध्ये खाजगीबँकांच्या २१ शाखा दिसून येतात.

**Keywords**—जोखीम व्यवस्थापन, जागतिक बँकिंग, कर्मचारी आणि ग्राहक, डिजिटल बँकिंग.

Impact Factor - 7.675 ISSN - 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## August-2021

ISSUE No- (CCCVIII) 308

## Sciences, Social Sciences, Commerce, Education, Language & Law

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr.Dinesh W.Nichit**
Editor
Principal,
Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, Walgaon.Dist. Amravati.

**Dr.Sanjay J. Kothari**
Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

## Aadhar International Publication

For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

| | | |
|---|---|---|
| 40 | मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी जैविक व शैक्षणिक पालकत्व<br>प्रा.गौरी चंद्रशेखर चिंचोळकर | 191 |
| 41 | Micro – Finance As A Tool For Rural Development<br>**Mr. Guruprasad Mohan Kulkarni / Dr.R.S.Nilpankar** | 193 |
| 42 | संत तुकाराम<br>सविता तेजराव शिंगणे | 198 |
| 43 | शेतकरी आत्महत्या - एक चिंतन<br>डॉ. एस. एच. भैरम | 202 |
| 44 | भारतीय कृषी नीती एवं किसानो के प्रश्न — एक अभ्यास<br>डॉ. रवि ना. साखरे | 208 |
| 45 | जागतिकीकरण आणि मराठी लोकनाट्ये<br>डॉ.चंद्रकुमार राहुले | 211 |
| 46 | Indian English : The Rise Of Dalit And Innovative Literature<br>**Anil Jaydeo Ganvir** | 214 |
| 47 | Women's Rights: Status and Goal The Role of Media in Women Empowerment<br>**Prof. Dr. Shirish S Nakhate** | 219 |

Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 308 (CCCVIII)
ISSN : 2278-9308
August, 2021

# Indian English : The Rise Of Dalit And Innovative Literature

Anil Jaydeo Ganvir
Assistant Professor & Head, Department of English Shree Pandharinath Arts & Commerce College, Narkhed

Abstract
This article argues that transactions between the English text and local conditions are an important aspect of developments in English in India,deciding interpretations in teaching and research. Texts appearing from current conditions feature in courses, with one of the most significant of these transactions resulting in the incorporation of Dalit and minority kinds of literature into English Studies. Perceived as an instrument of empowerment by Indians almost from the time it was introduced, English has never quite lost this aspect of its role and even as the discipline has taken note of global expansions in the field through theory and the incorporation of new areas, it has gradually acquired a strong national/regional flavour through the incorporation of texts that have emerged out of struggles for visibility and voice by marginal groups. The rise of Dalit and Northeast Indian English literature and their incorporation into English syllabi are two examples of this trend.

While trying to capture a sense of the current status of the discipline of English as it is taught at college and university level in India, and brought up short by the impossible task of pulling together the many ways in which the discipline exists here, I realised that perhaps the only common thread that runs through its multiple practices is the growing interest in Dalit writing from all over the country and writings (mostly in English) from the northeastern states of India (or NE as it is commonly known). The bird's eye view would reveal pieces of literature from these two sites the Dalit and the NE – making the most significant impact on the discipline by their hospitality to current developments in theory, their strong ideological moorings in the otherness of caste and tribe respectively, and, perhaps most importantly, their accessibility as areas of study.

'English in India' as a meta-issue has been the subject of study ever since Gauri Viswanathan's Masks of Conquest demonstrated how English literature was used by the British as a tool of subject construction and governance.

